17 SEP 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ओझोन दिनानिमित्त स्पर्धांचे विद्यापीठात बक्षीस वितरण

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे जागतिक ओझोन दिनानिमित्त झालेल्या विविध स्पर्धांचे आज बक्षीस वितरण झाले. पर्यावरणशास्त्र विभाग, इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग रेफ्रिजरेशन आणि एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने त्याचे आयोजन करण्यात आले.

वादविवाद स्पर्धेत नटराज शिरोळकर व सच्चीदानंद भोसले, प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रसाद मोहिते, विनायक साळुंखे व प्रणव महाजन यांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. आरती साबळे व हरीश सुतार यांनी रांगोळी स्पर्धेत यश मिळवले. पोस्टर व फोटोग्राही करत अनुक्रमे नटराव शिरोळकर, ओंकार पाटील व प्रियांका पाटील यांना बक्षीस देण्यात आले. रांगोळीसाठी परीक्षक म्हणून चित्रकार स्वरूप भोसले, पोस्टर व फोटोग्राफीसाठी प्रा. शैलेश राऊत यांनी काम पाहिले.इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग रेफ्रिजरेशन आणि एअर कंडिशनिंग इंजिनिअर्सचे सुरेश पाटील,प्रमोद पुंगावकर, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे डॉ. ए. एम. गुरव प्रमुख, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. अधिव्याख्याता डॉ. आसावरी जाधव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. गीतांजली मोरे व प्रणाली काळेबेरे यांनी सूत्रसंचालन केले. राजेंद्र इंगवले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 SEP 2017
सकाळ

# लोकशाही विकासाचा राजमार्ग व्हावी : आनंदकुमार

कोल्हापूर, ता. १६ : भारतीय लोकशाही ही विकासाच्या संदर्भात नवीन रस्ता बनवायला हवा, असे सामाजिकशास्त्रज्ञांचे मत असल्याचे जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे प्रा. आनंदकुमार यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागाने आयोजित केलेल्या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. समाजशास्त्र अधिविभागाचे माजी विभागप्रमुख, डॉ. एस. एन. पवार अध्यक्षस्थानी होते.

प्रा. आनंदकुमार म्हणाले, "स्वातंत्र्यानंतरच्या सत्तर वर्षांच्या प्रवासात लोकशाहीमध्ये विकासातील शासन स्तरावरील, कायद्याच्या अंमलबजावणीमधील, लोकशाहीतील नागरिकांचा आणि राष्ट्रबांधणीतील अभाव या प्रमुख अभावांचा विचार करुन कृतिशील कार्यक्रमाची अंमजबजावणी करणे गरजेचे आहे. स्वातंत्र्यानंतरचे पहिले संकट धर्म आणि भाषावार प्रांत रचनेने केले आहे. जागतिक विकासाच्या क्रमवारीत आपण मागे आहोत. निवडणुकीची प्रक्रिया पैसा, संप्रेक्षण आणि शक्तिप्रदर्शनामुळे दोषपूर्ण आहे. त्यामुळे शासनाने पोसलेले गुंड विचारू लागलेत की, हे का लिहिले? ते का लिहिले? संसदेमध्ये तर स्वातंत्र्यानंतरच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्त्री प्रतिनिधित्व नाही. यामुळे भारतीय स्त्री ही पूर्ण नागरिक होऊ शकलेली नाही."

या वेळी विद्वानांच्या वैचारिक भाषणांच्या ओकेजनल पेपरचे प्रा. आनंदकुमार यांच्या हस्ते प्रकाशन केले.समाजशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख, डॉ. जगन कराडे यांनी समाजशास्त्र अधिविभागाच्या प्रगतीचा आढावा घेऊन व्याख्यानमालेचा उद्देश व्यक्त केला. समाजशास्त्र अधिविभागाचे माजी विभागप्रमुख, प्रा. डॉ. आर. बी. पाटील सेंटर फॉर सोशल स्टडीज, सुरत येथील डॉ. विमल त्रिवेदी उपस्थित होते. डॉ. प्रतिमा पवार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. प्रल्हाद माने आभार मांडले.